वाचले : १.मा.आयुक्त सो यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कवि/५२१/२०१८ दि.१३/१२/२०१८

२. मा.आयुक्तसो यांचेकडील दि.१०/ ०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

३. मा.आयुक्तसो यांचेकडील दि.१०/ ०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

४. जाहीरात क्र.२३/२०२४,दि.१२/०६/२०२४.

५. मा.आयुक्त सो यांचेकडील दि. ०१/०७/२०२४ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ स्थापना दि. ११/१०/१९८२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
क्र.वायसीएमएच/११/काचि/ ६५५/२०२४
दिनांक- ०१ / ०७/२०२४

**विषय:- मनपाचे पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर विविध डॉक्टरांची पदे भरणेबाबत..**

आदेश,

उपरोक्त वाचले क्र.१ चे अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन रूग्णालयीन कामकाजाकरीता विभागप्रमुख मान्यता देणेत आलेली आहे. तसेच वाचले क्र.२ व ३ अन्वये कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी - सी.एम.ओ/शिफ्ट ड्युटी/बी.टी.ओ पदे रुग्णालयीन स्तरावर नियुक्त करणेस मंजुरी दिली आहे. प्रपत्र " अ " मध्ये नमुद केलेल्या कालावधीकरीता अस्थायी पदावर मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूगणालयात खालील अटी शर्तीस अधिन राहून नियुक्ती देणेत येत आहे. निवड झालेल्या खालील उमेदवारांस त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय यांचेकडील आदेश क्र. वैद्य/३/कावि/५५६/२०२० दि.०३/०९/२०२० अन्वये दरमहा सुधारीत मानधन खालील रकाना क्र.७ मध्ये नमुद केलेप्रमाणे अदा करणेत येईल.

**प्रपत्र अ**

**सी.एम.ओ./ वैद्यकिय अधिकारी शिफ्ट डयुटी/बी.टी.ओ/ कनिष्ठ निवासी**

**(नेमणूक कालावधी दि. ०१/०७/२०२४ ते दि:२५ १२/२०२४ अखेर १८० दिवसांकरिता)**

| अक्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | पद | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | दरमहा विद्यावेतन रू. | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सुजित अरुण कल्हापुरे | एम.बी.बी.एस. | सी.एम.ओ. | इ.मा.व. | खुला | सी.एम.ओ. | ७५,०००/- | १४ |
| २ | डॉ.मयुर गंगाधर पांगरे | एम.बी.बी.एस. | सी.एम.ओ. | इ.मा.व. | इ.मा.व. | सी.एम.ओ. | ७५,०००/- | १२ |
| ३ | डॉ. अनुकुल अशोकराव कदम | एम.बी.बी.एस. | एस.डी.एम.ओ | खुला | खुला | पोस्ट मार्टम | ७५,०००/- | १३ |
| ४ | डॉ. गणेश किशनराव लांडे | एम.बी.बी.एस. | बी.टी.ओ. | खुला | खुला | ब्लड बँक | ८०,०००/- | १२ |
| ५ | डॉ. अनुराग गणेश परिहार | एम.बी.बी.एस. | बी.टी.ओ. | वि.जा.-अ | वि.जा.-अ | ब्लड बँक | ७५,०००/- | ०८ |
| ६ | डॉ. मोहीन शेखमुक्तार बेदरेकर | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | इ.मा.व. | खुला | मेडीसीन | ६४,५५१/- | १३ |
| ७ | डॉ. राजेश्वरी संजय भोईटे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | मेडीसीन | ६४,५५१/- | ०६ |
| ८ | डॉ. स्नेहा संजीव गुनाले | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | इ.मा.व. | इ.मा.व. | मेडीसीन | ६४,५५१/- | ०८ |
| ९ | डॉ. आरती विरभद्र स्वामी | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | गायनॅक | ६४,५५१/- | ०९ |
| १० | डॉ. रुपाली रमेश उचित | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | इ.मा.व. | इ.मा.व. | गायनॅक | ६४,५५१/- | ०८ |
| ११ | डॉ.मयुर संजय जांवळे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | न्युरो सर्जरी | ६४,५५१/- | १३ |
| १२ | डॉ. सतिश लक्ष्मण नवले | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | बालरोग विभाग | ६४,५५१/- | १३ |
| १३ | डॉ. प्रतिक्षा कुशब मेश्राम | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती | बालरोग विभाग | ६४,५५१/- | १२ |
| १४ | डॉ. प्रकाश सुर्यकांत कोयाडे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | भटक्या जमाती-क | खुला | इमर्जन्सी वॉर्ड | ६४,५५१/- | ०९ |
| १५ | डॉ. शुभम धर्मराज बटुले | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | आय.सी.यु. | ६४,५५१/- | १२ |
| १६ | डॉ. दिपीका दुर्योधन तवर | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | आय.सी.यु. | ६४,५५१/- | ११ |
| १७ | डॉ. मारिया शब्बीरअली बादशाह | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | आय.सी.यु. | ६४,५५१/- | ०९ |
| १८ | डॉ. प्रज्वल हरिदास मुंढे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | इ.मा.व | इ.मा.व. | आय.सी.यु. | ६४,५५१/- | ११ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | डॉ. निहाल सुरेश डिंबर | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | भटक्या जमाती-ब | भटक्या जमाती-ब | आय.सी.यु. | ६४,५५१/- | ०७ |
| २० | डॉ. भरत दगडू कु-हाडे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | उरोरोग | ६४,५५१/- | ११ |
| २१ | डॉ. निकीता मेहता | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | खुला | खुला | क्ष - किरण विभाग | ६४,५५१/- | ११ |
| २२ | डॉ. अक्षय राजेंद्र भार्गव | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | इ.मा.व | खुला | दंतरोग | ६४,५५१/- | १४ |
| २३ | डॉ.अर्चना अंजानेयुलू येन्नाम | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. | दंतरोग | ६४,५५१/- | १३ |
| २४ | डॉ. स्नेहा गंगाधर मोरे | एम.बी.बी.एस. | कनिष्ठ निवासी | अनु. जाती | अनु.जाती | दंतरोग | ६४,५५१/- | १३ |

उपरोक्त रिक्त पदांचा विचार करता यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता निवड झालेल्या वरील तक्त्यातील कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी - सी.एम.ओ/शिफ्ट ड्युटी/बी.टी.ओ पदावर, त्यांच्या नावापुढे नमुद केलेल्या विभागात व उक्त प्रपत्र " अ " मध्ये नमुद केलेल्या कालावधीकरीता नियुक्ती देणेत येत आहे. खालील अटी व शर्ती चे पालन करणे बंधनकारक राहील.

<u>अटी शर्ती</u>

1. निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा विद्यावेतन/मानधन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे व नियमानुसार अनुज्ञेय असेल.
2. निवड झालेल्या उमेदवारांना विद्यावेतन/मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही आर्थिक फायदे मिळणार नाहीत. उदा. बोनस व सानुग्रह अनुदान, वैद्यकीय प्रतिपुर्ती इ.
3. नेमणुकीच्या कालावधीत दिड महीन्यात १ अशा सहा महीन्यात ४ व वर्षातुन फक्त ८ दिवस किरकोळ रजा अनुज्ञेय राहील.
4. सदर नेमणुक ही पुर्णपणे तात्पुरत्या/हंगामी स्वरूपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. व तशी अस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करता येणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. कोणत्याही मे. न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र सादर करावे लागेल.
5. नेमणुक झालेली सेवा तात्पुरती स्वरुपाची असुन, ती केव्हाही सुचना न देता संपुष्टात येईल.
6. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ च्या अंतर्गत आपल्या नावाची नोंदणी करणे किंवा भारतीय वैद्यकीय परिषद रजिस्टरमध्ये त्यांचे नाव समाविष्ठ असणे आवश्यक आहे.
7. नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवास भत्ता, इतर सवलत मिळणार नाही.
8. त्यांनी संस्थेच्या व कामाच्या प्रती एकनिष्ठेची शपथ घेतली पाहिजे.
9. नियुक्तीच्या विभागात कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी - सी.एम.ओ/शिफ्ट ड्युटी/बी.टी.ओ यांनी हजर राहणे बंधनकारक असुन गैरहजर आढळुन आल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच शासन नियमानुसार त्यांचेकडुन बंधपत्राची रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.
10. सदर नियुक्ती ही अस्थायी असल्यामुळे हा कालावधी पुर्ण होताच सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
11. आपले मुळ कागदपत्र ज्या शासकीय/महापालिका वैद्यकीय महाविद्यालयाकडे आहेत त्या कागदपत्रांची पडताळणी साठी या कार्यालयास एक महिन्याच्या आत सादर करावी.
12. आपण या आदेशाप्रमाणे नियुक्ती स्वीकारल्यास व दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी सेवेत रुजू झाल्यास वरील अटी व शर्ती आपणास मान्य आहेत. असे गृहीत धरण्यात येईल. रुग्णालयीन सोयीच्या दृष्टीने पि. चि. मनपाच्या कोणत्याची रुग्णालयात काम करणे बंधनकारक राहील.
13. नियुक्ती झालेल्या उमेदवारास सदर पद/नोकरी सोडताना किमान एक महिन्याची पुर्वसुचना देणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांना एक महिन्याचे मानधन महापालिका कोषागरात जमा करावे लागेल. तथापि, पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय (वाय.सी.एम) अंतर्गत तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिके अंतर्गत नियुक्ती झाल्यास सदर सेवेत रूजू होण्याच्या अटीवर एक महिन्याची पुर्व सुचना देण्याची अथवा एक महिन्याचे मानधन मनपा कोषागारात जमा करण्याची आवश्यकता नाही.
14. कामावर येताना व जाताना नियमित बायोमेट्रीक पध्दतीने थम्ब इंम्प्रेशन करून व हजेरी मस्टरवर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. ज्या दिवसांचा थम्ब व हजेरीमस्टवर स्वाक्षरी नसेल त्यादिवसाचे विद्यावेतन/मानधन अदा केले जाणार नाही. थम्ब इंप्रेशन करताना वेळेत करणे आवश्यक आहे, लेट झाल्यास तीन लेट मागे एक दिवसाचे वेतन कपात करणेत येईल. याकामी शाखाप्रमुखांनी हजेरी पत्रक/बायोमेट्रीक थम्ब इंम्प्रेशन पडताळणी करून स्वाक्षरीसह सादर करणे बंधनकरक आहे.
15. कामावर वेळेत हजर राहून ओळखपत्र व गणवेश परिधान करणे बंधनकारक राहिल अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल.
16. नेमणुक झालेल्या उमेदवारांनी रूजू झालेवर त्यांचे वेतन अदा करणेकरीता फक्त बॅक ऑफ बडोदा पी.सी.एम.सी शाखा मुख्य कार्यालय पिंपरी पुणे -१८ येथे खाते उघडून खाते क्रमांक व ई सी एस फॉर्म भरून सोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून शाखा प्रमुखांमार्फत संबधीत पगार लिपिकाकडे सादर करणेत यावी. सदर पुर्तता वेळेत न केलेस व पगारास विलंब झालेस त्यास रूग्णालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

17. नेमणुक झालेल्या उमेदवारांना यांनी, मा. अधिष्ठाता, यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करावयाचे आहे. यामध्ये टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा केल्यास त्यांचा कार्यकाल खंडीत करण्यात येईल.नेमणुक केलेल्या सी.एम.ओ./ वैद्यकिय अधिकारी शिफ्ट डयुटी /बी.टी.ओ./ कनिष्ठ निवासी यांना रूग्णालयीन सोयीनुसार पि.चि. मनपाच्या इतर रुग्णालयात विभागात कामकाज करणे बंधनकारक आहे.

18. आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत रूजू न झालेस सदरचा आदेश रद्द करण्यात येईल. या बाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगर पालिका
पिंपरी-१८

प्रति:- डॉ.